सेवा • संस्कार • समरसता

# लोक उत्कर्ष समिती

## कार्यवृत्त – २०२४–२५



**जनसेवा हीच ईश्वरसेवा**







## Presidents Message

Since 1981, Lok Utkarsh Samiti Trust has been actively working and last year we published the Trust's Annual Report for the first time. In that report, we informed you that the Trust had purchased a new plot in 2023. We had decided to construct a well-equipped office on that land and had also initiated fund raising for the same. We are pleased to inform you that the construction of the office building has now commenced. We are confident that, with your continued support, this construction will be completed within the next year.

As every year, this year too, Lok Utkarsh Samiti Trust successfully organized blood donation camps and a lecture series.

In the coming time, the Trust plans to carry out Skill Development Program useful for aspiring young entrepreneurs, small business starters, and startup founders. Additionally, we intend to start Study Centres for underprivileged students.

To complete the construction of the Trust's building (Sangh Office), we are once again appealing for substantial financial contributions from all well-wishers like you. Lok Utkarsh Samiti Trust is eligible for exemption under Income Tax Act Section 80G.

We are extremely thankful to you for your valuable support in the past and we request the same kind of cooperation in the coming year as well.

**Vidnyanand Deodhar**
President

## मनोगत

१९८१ पासून लोक उत्कर्ष समिती या ट्रस्टचे काम सुरू आहे व मागील वर्षीच या कामाचा वार्षिक अहवाल आपण प्रथमच प्रसिद्ध केला. मागील अहवालात आपणा सर्वांना ट्रस्ट करिता २०२३ साली एक नवीन जागा विकत घेतल्याची माहिती दिली होतीच. त्या जागी एक सुसज्ज कार्यालय बांधण्याचे नक्की करून आपण त्याकरिता अर्थ उभारणी सुद्धा सुरू केली. आता सर्वांना कळविण्यास आनंद होतो आहे की, कार्यालयाच्या इमारतीचे प्रत्यक्ष काम सुरू झाले आहे आणि पुढील वर्षभरात हे बांधकाम आपणा सर्वांच्या सहकार्याने पूर्णत्वास जाईल याबद्दल विश्वास वाटतो.

प्रतिवर्षीप्रमाणे लोक उत्कर्ष समिती ट्रस्टतर्फे रक्तदान शिबिर आणि व्याख्यानमाला असे उपक्रम यावर्षी पार पडले.

येणाऱ्या काळात ट्रस्टच्या वतीने तरुण उद्योजक, नव्याने छोटे उद्योग आणि स्टार्टअप सुरू केलेले होतकरू तरुण यांच्या करिता उपयोगी होतील अशा कौशल्य विकास कार्यक्रमांची रचना केली जाणार आहे. शिवाय गरजू विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करण्याचाही मनोदय आहे.

ट्रस्टच्या इमारतीचे(संघ कार्यालय) बांधकाम पूर्ण करण्यासाठी यावर्षी सुद्धा आपणा सर्वांसारख्या हितचिंतकांकडून भरीव आर्थिक योगदानाची अपेक्षा आहे. लोक उत्कर्ष समिती हा ट्रस्ट आयकर नियम ८०-जी अंतर्गत सवलतीस पात्र आहे.

यापूर्वी आपणा सर्वांनी बहुमोल सहकार्य केले आहेच. असेच सहकार्य या पुढील वर्षी सुद्धा आपण करावे अशी विनंती करीत आहे.

**विद्यानंद देवधर**
अध्यक्ष

## Blood Donation Camps

Due to the shortage of blood in Kolhapur city, as every year, we conducted blood donation camps at five different locations around August 14 which is observed as Akhand Bharat Sankalp Din.

| Area | Venue | Donors |
|---|---|---|
| Shivaji Nagar | Phulewadi | 14 |
| Katyayani Nagar | Pachgaon | 40 |
| Ujlaai Nagar | Shivajinagar | 46 |
| Shahu Nagar | Pratibha Nagar | 22 |
| Rajaram Nagar | Rajarampuri | 42 |

` The camps began with Deep Prajwalan and Bharat Mata Pujan. Local youth groups actively participated. Esteemed citizens, social organizations and wrestling gyms also extended their support. Various speakers delivered speeches on the importance of blood donation and Akhand Bharat Sankalp Din. Notably, this year saw increased participation from women.

Notably, in the premises of Trimurti Bhakta Mandal in Ujlai Nagar, a public flag hoisting ceremony was held by Kumari Sneha Sampat Gaikwad, who passed the tenth standard with top marks and the national anthem was played. On this occasion, both Sneha Gaikwad and Sahil Sameer Sheikh, who joined the Indian Navy, were felicitated.

In some camps, doctors from blood banks offered inspiring guidance. Blood banks that collaborated (as in previous years) were :

Rajarshi Shahu Blood Bank, Vaibhav Laxmi Blood Bank, Mahalaxmi Blood Bank, Sanjeevani Blood Bank, and CPR Blood Bank.

## रक्तदान शिबिर

कोल्हापूर शहरात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्यामुळे दरवर्षीप्रमाणे आपण १४ ऑगस्ट अखंड भारत संकल्प दिनानिमित्त, त्या दरम्यान पाच ठिकाणी नियोजनबद्ध प्रयत्न करून रक्तदान शिबिरे घेतली. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे

| नगर | शिबीर स्थान | संख्या |
|---|---|---|
| शिवाजीनगर | फुलेवाडी | १४ |
| कात्यायनीनगर | पाचगाव | ४० |
| उजळाईनगर | शिवाजीनगर | ४६ |
| शाहूनगर | प्रतिभा नगर | २२ |
| राजाराम नगर | राजारामपुरी १३ वी गल्ली | ४२ |


अन्य नगरे वरील नगरात सहभागी झाली होती.

अनेक ठिकाणी दीप प्रज्वलन करून भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्या त्या भागातील तरुण मंडळे सहभागी झाली होती. तसेच शिबिरांना प्रतिष्ठित नागरिकांनी भेटी दिल्या व शहरातील नागरिक, तालमी, सामाजिक संस्था यांचा पण सहभाग होता. तेथे विविध वक्त्यांची भाषणे पण झाली. त्यात रक्तदानाचे महत्त्व, अखंड भारत संकल्प दिवसाचे महत्व सांगण्यात आले. बहुतेक ठिकाणी यावर्षी महिलांचा सहभाग होता

विशेष म्हणजे उजळाई नगर मध्ये त्रिमूर्ती भक्त मंडळाचे प्रांगणात दहावी मध्ये अव्वल गुणांनी पास झालेली कुमारी स्नेहा संपत गायकवाड हिच्या हस्ते सार्वजनिक ध्वजारोहण करण्यात आले व राष्ट्रगीताने मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी स्नेहा गायकवाड व इंडियन नेव्ही मध्ये दाखल झालेला साहिल समीर शेख या दोन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला

काही ठिकाणी ब्लड बँकेच्या डॉक्टरांचा सहभाग प्रेरणादायी होता. रक्तदान शिबिरासाठी मागील वर्षी प्रमाणे खालील ब्लड बँकांचे सहकार्य लाभले.

राजर्षी शाहू ब्लड बँक, वैभव लक्ष्मी ब्लड बँक, महालक्ष्मी ब्लड बँक, संजीवनी ब्लड बँक व सीपीआर ब्लड बँक.





## Post-Flood Relief Work

In July 2024, excessive rainfall led to flooding. In the ensuing cleanliness drive, 22 volunteers participated. Around 400 families were provided with sanitation kits that included incense sticks, mosquito repellent sticks, phenyl, anti-fungal cream, Medichlor tablets, DDT powder, etc. Medical spraying was carried out in various places. A health camp was also held where a mobile clinic examined about 450 homes.

## Distribution of goods at Shivaji University

On Thursday, 15th August 2024, on Independence Day, raincoats and gardening materials were distributed to the students of the Kamwa and Shika Department of Shivaji University on behalf of the Lok Utkarsh Samiti. On this occasion, Vice-Chancellor Shirke Sir, trustees of Lok Utkarsh Samiti and about 125 students of the Kamwa and Shika Department were present.




## Fund Raising

After estimating the total cost, it was decided to demolish the building and build a new one. Accordingly, a plan was made to collect funds at the district and city levels. Fund raising heads were appointed in all the mandals and cities. Instructions were given to accept funds only through cheques or bank virtual systems. Now a centralized system has been created for collection in the office itself.

It was realized that usually funds can be collected by visiting each person twice or thrice. Many new contacts were made on this occasion. It was realized that some of these people can also be added to the usual team work. Even after the starting the construction, it is planned to collect funds from more people by sending photos and videos of it.

## पूरस्थिती नंतर सेवा कार्य

जुलै २०२४ मध्ये जास्त पाऊस झाला होता. पूर परिस्थिती निर्माण झाली होती. यात झालेल्या स्वच्छता मोहिमेत २२ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. या वेळेला ४०० कुटुंबांना स्वच्छता कीट वाटप करण्यात आले. त्यामध्ये धूप, मच्छर अगरबत्ती, फिनेल, anti fungal cream, medi clour गोळी, DDT पावडर वगैरे गोष्टी होत्या. विविध ठिकाणी औषध फवारणी देखील करण्यात आली. तसेच आरोग्य शिबिर पण संपन्न झाले. फिरत्या दवाखान्याने सुमारे ४५० घरामध्ये रुग्ण तपासणी केली.

## शिवाजी विद्यापीठात केलेले वस्तूरूप वाटप

गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ या स्वातंत्र्यादिनी शिवाजी विद्यापीठातील कमवा व शिका विभागातील विद्यार्थ्यांना रेनकोट व बागकाम उपयोगी साहित्याचे वाटप लोक उत्कर्ष समितीच्यावतीने करण्यात आले. या वेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, लोक उत्कर्ष समितीचे विश्वस्त आणि कमवा व शिका वसतिगृहातील १२५ विद्यार्थी उपस्थित होते.



## निधी संकलन

एकूण खर्चाचा अंदाज घेऊन इमारत पाडून नवीन बांधण्याचे ठरले. त्यानुसार जिल्हा व शहराच्या दोन स्तरावर निधी संकलन करण्याचे नियोजन झाले. सर्व मंडळ व नगरामध्ये निधी संकलन प्रमुख नेमले. फक्त धनादेश किंवा बँकेच्या आभासी प्रणालीद्वारेच निधी स्वीकारण्याच्या सूचना दिल्या गेल्या. आता कार्यालयामध्येच संकलनासाठी केंद्रीकृत व्यवस्था तयार केली आहे.

सहसा दोनदा किंवा तीनदा प्रत्येक व्यक्तीकडे जाऊनच निधी गोळा होऊ शकतो असे ध्यानात आले. या निमित्ताने बरेच नवीन संपर्क झालेत. नेहमीच्या सामाजिक कामाला देखील यातील काही जण जोडता येतील असे लक्षात आले. बांधकाम सुरू झाल्यावर देखील त्याचे फोटो, व्हिडिओ पाठवून अधिक लोकांच्याकडून निधी गोळा करण्याची योजना केलेली आहे.

## Study Center Plan

Plans are underway to start Study Centers at three locations in Kolhapur. These centers will offer space for students to study, and expert mentors will be available to resolve their doubts.

## अभ्यासिकेची योजना

कोल्हापुरात लवकरच शक्यतो तीन ठिकाणी अभ्यासिका सुरू करण्याची योजना आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध असेल. तसेच तज्ञ व्यक्ती शंका निरसन करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

## Support to Service Activities

Various service initiatives were generously supported by Panchganga Nagari Sahakari Bank Ltd. and Radhakrishna Tarun Mandal.

## सेवा उपक्रमांना सहकार्य

सेवा कार्यातील विविध उपक्रमांना पंचगंगा नागरी सह. बँक लि. व राधाकृष्ण तरुण मंडळ यांचे विशेष सहकार्य

## डॉ. के. ब. हेडगेवार व्याख्यानमाला

लोक उत्कर्ष समिती व हिंदू व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पू. डॉ. के. ब. हेडगेवार व्याख्यानमाला १९९६ पासून आयोजित करण्यात येत आहे. वर्षप्रतिपदा (गुढी पाडवा) या दिवशी पू. डॉक्टरांचा जन्मदिन असतो. त्यानंतरचे तीन दिवस ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते. यावर्षी सदर व्याख्यानमाला दि. ३१ मार्च, १ व २ एप्रिल २०२५ या तीन दिवशी राजर्षि शाहू स्मारक भवन येथे उत्साहात संपन्न झाली.

पहिले पुष्प : दि. ३१ मार्च २०२५, श्री. निलेश रमेश भिसे, विषय : हिंदू रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज

दुसरे पुष्प: दि. १ एप्रिल २०२५, सौ. अश्विनी मयेकर, विषय : संस्कृती रक्षक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

तिसरे पुष्प: दि. २ एप्रिल २०२५, श्री. प्रफुल्ल केतकर, विषय : भारत बोध, कथ्य व सत्य

सर्व व्याख्यानांना श्रोत्यांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला.

## Dr. K. B. Hedgewar Lecture Series


The Puj. Dr. K. B. Hedgewar Lecture Series has been organized since 1996 under the joint auspices of Lok Utkarsh Samiti and Hindu Vyaspeeth. The birthday of the Puj. Doctor is on Varshapratipada (Gudhi Padwa). The lecture series is organized for three days thereafter. This year, the lecture series concluded with enthusiasm on March 31, April 1 and 2, 2025 at Rajarshi Shahu Smarak Bhavan.

First Lecture : March 31, 2025 Shri. Nilesh Ramesh Bhise
Topic : Hindu Protector – Dharmaveer Chhatrapati Sambhaji Maharaj

Second Lecture: April 1, 2025 Mrs. Ashwini Mayekar
Topic: Cultural Guardian – Punyashlok Ahilyadevi Holkar

Third Lecture: April 2, 2025 Shri. Prafull Ketkar
Topic: Bharat Bodh – Message and Truth







## महापुरुष अभिवादन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त कोषाध्यक्ष प्रमोद ढोले व अनेक स्वयंसेवकांनी अहिल्याबाई होळकर यांच्या भव्य पुतळ्यास अभिवादन केले. तेथे लोकमाता अहिल्याबाई विचार मंचचे श्री. बबनराव रानगे यांचा विशेष परिचय झाला.

तसेच दरवर्षीप्रमाणे विविध महापुरुषांना त्यांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त अभिवादन केले. बुद्ध पौर्णिमेस अनेक स्वयंसेवकांनी भगवान बुद्धांना अभिवादन केले. अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त स्वयंसेवकांनी राजारामपुरीतील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला हार घालून अभिवादन केले. तसेच विवेक विचार मंच तर्फे पहिली ते पाचवी व पाचवी ते दहावी निबंध स्पर्धा घेतली. यामध्ये एकूण १२० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विवेक विचार मंच तर्फे हायस्कूल मधील विद्यार्थ्यांनी प्रेरणा दिन साजरा केला या दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र व विविध पुस्तकांचे दिवसभर वाचन झाले. बसवेश्वर जयंती निमित्त महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन व मुंबई तरुण भारतने त्यांच्या जीवनावर प्रकाशित केलेल्या अंकाचे प्रकाशन व २०० अंकांचे वितरण करण्यात आले. शाहू जयंती निमित्त राजश्री शाहू महाराज जन्मस्थळाला भेट व अभिवादन आणि भाऊसिंगजी रोडवरील कांबळे यांच्या हॉटेलच्या स्मृती स्तंभाला हार घालून अभिवादन असे विविध उपक्रम करण्यात आले.










## Tribute to Great Personalities

On the 300th birth anniversary of Punyashlok Ahilyadevi Holkar, the treasurer Mr. Pramod Dhole and many volunteers paid homage to her grand statue. During this event, special interactions were held with Mr. Babanrao Range from Lokmata Ahilyabai Vichar Manch.

As every year, tributes were paid to great leaders on their birth and death anniversaries: On Buddha Purnima, volunteers paid homage to Lord Buddha.On Annabhau Sathe Jayanti, volunteers garlanded his statue in Rajarampuri. An essay competition was organized by Vivek Vichar Manch for students from class 1 to 10, with a total participation of 120 students. On Dr. Babasaheb Ambedkar Jayanti, "Inspiration Day" was observed in a high school with day-long readings of his biography and related books.On Basaveshwar Jayanti, homage was paid and Book was published. 200 copies of book published by Mumbai Tarun Bharat were distributed. On Shahu Jayanti, volunteers visited and paid tribute at Rajarshi Shahu Maharaj's birthplace and at the Memorial Column of Mr. Kamble on Bhausinghji Road.

## Entrepreneur Meet

For the past nine years, the Entrepreneur Meets have been held in Kolhapur. Currently, the network consists of 85 members, with weekly gatherings of 10–15 individuals. Topics such as business challenges, government regulations, labour issues, and profit enhancement are discussed. Expert C.A., C.S., and business coaches are invited for guidance. This platform also provides excellent networking opportunities. Similar meetings are planned to be started in three or four more areas in the city.

## Patient Aid Equipment Service Center

As every year, through the Rajabhau Bhosale Patient Aid Equipment Service Center, essential medical aids such as walkers, wheelchairs, commode chairs, air beds, folding beds, oxygen concentrators, etc. were distributed free of cost to needy patients.

## Trust's Monthly Meetings

To manage regular operations, monthly meetings were conducted throughout the year. Other relevant volunteers joined as needed.

## Annual Planning Meeting

To ensure the effectiveness of Lok Utkarsh Samiti's work, an annual planning meeting was organized. Planning for the year's activities and new initiatives was carried out in this session.

## New Office Building Construction

Construction of the new Trust office building has commenced, and completion is planned within the year. Photographs showing the current progress of the work are printed along with the report.

## उद्योजक मिलन

गेली नऊ वर्षे व्यवसायिकांचे उद्योजक मिलन कोल्हापुरात भरते आहे. सध्या याची पटसंख्या ८५ असून सर्व साधारणपणे दर आठवड्यास दहा-पंधरा जणांचे एकत्रीकरण असते. व्यवसायातील विविध प्रश्न, सरकारी नियम, कामगारांचे विषय, फायदा कसा वाढवावा या व अशा विविध विषयावर येथे चर्चा व मार्गदर्शन होते. त्यासाठी नामांकित सी.ए., सी.एस., व्यावसायिक कोच असे अनेक जण येथे मार्गदर्शनासाठी येत असतात. व्यावसायिकांना येथे नेटवर्किंगसाठी पण चांगला फायदा होतो.

अशा प्रकारचे उद्योजक मिलन शहरात इतर तीन चार ठिकाणी सुरू करण्याचा पुढे संकल्प आहे.

## रुग्णोपयोगी साहित्य सेवा केंद्र.

राजाभाऊ भोसले रुग्णोपयोगी साहित्य सेवा केंद्रामार्फत दरवर्षीप्रमाणे यंदा गरजू रुग्णांना वॉकर, व्हीलचेअर, कमोड चेअर, एअर बेड, फोल्डिंग बेड, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर इ. विविध साहित्य विनामूल्य देण्यात आले.

## ट्रस्टच्या मासिक बैठका

नियमित कामकाजासाठी या वेळेला वर्षभर नियमित मासिक बैठका घेऊन विविध विषयांचा उहापोह केला गेला. गरजेप्रमाणे त्यात अन्य संबंधित कार्यकर्ते पण सहभागी होत असत.

## वार्षिक नियोजन बैठक

लोक उत्कर्ष समितीचे कार्य प्रभावी होण्याच्या दृष्टिकोनातून यावर्षी वार्षिक नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले. वर्षभराच्या विविध कामाचे नियोजन व नवीन उपक्रम याची यात योजना ठरली.

८० जी सर्टिफिकेट : निधी मिळवणे सुलभ व्हावे या दृष्टीने यावर्षी प्रयत्न करून ८० जी सर्टिफिकेट मिळालेले आहे. त्याचा क्र. AABTL3315JE2021501

## कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम

कार्यालयाच्या नवीन इमारतीसाठी बांधकामाला सुरूवात झाली असून यावर्षी बांधकाम पूर्ण करण्याची योजना आहे. कामाच्या आज असलेल्या प्रगतीचे फोटो सोबत छापलेले आहेत.



Reg. No. F - 1984-KOP

सेवा • संस्कार • समरसता

# लोक उत्कर्ष समिती

२४१८, बी, रामकृष्ण अपार्टमेंट, तस्ते गल्ली, मंगळवार पेठ, कोल्हापूर – ४१६ ०१२
e-mail : lokutkarshasamiti@gmail.com

| CSR Number | 80-G Number |
|---|---|
| **CSR00069394** | **AABTL3315JE2021501** |

**विद्यानंद शंकर देवधर**
अध्यक्ष
मो. ९८२२३२५१३६

**भास्कर श्रीनिवास कामत**
उपाध्यक्ष
मो. ९४२०४५५४४७

**संतोष शिवाजीराव गाताडे**
कार्यवाह
मो. ९४२२५८२३१४

**प्रमोद गजानन ढोले**
कोषाध्यक्ष
मो. ९८२२३ ७६१८३

**विजय शंकरराव पुजारी**
वास्तू प्रमुख
मो. ९४०३४५१६३९

**सुनील बाबासाहेब पाटील**
सह सचिव
मो. ९४२०७७८६०७

सदस्य : **दीपक वसंतराव सांगलीकर, संदीप आदिनाथ पाटील**
**उपेंद्र बिंदूराव सांगवडेकर, भगवान सुबराव खाडे, सौ. विद्या सूर्यकिरण वाघ**

## नियोजित वास्तू




### बांधकामाची सद्यस्थिती

**प्रथम ठरल्याप्रमाणे जुनी इमारत पूर्ण पाडण्यात आली. त्यानंतर खुदाई करून पाया पूर्ण करण्यात आला. आता वरील काम चालू असून जोता लेवल पर्यंतचे काम देखील लवकरच पूर्ण होईल.**

माहितीसाठी नवीन कार्यालयाचा पत्ता खाली देत आहोत-

**४८४/क/९, हिंदुराव घाटगे कॉलनी, पल्स हॉस्पिटलच्या मागे, कदमवाडी रोड, कोल्हापूर - ४१६००३**